| MHKO200004022022 | नियमीत दिवाणी दावा क्र. १०२/२०२२ नि.३१ खालील आदेश<br><br>किशोर गोपाळ बोरवणकर विरुध्द सरपंच ग्रामपंचायत आंबर्डे वगैरे |
|---|---|

वादी यांनी सदरचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे मोजणी करीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती होणेसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत नि.क्रं. १७ वर दाखल केली आहे. प्रस्तुत कामी वादी यांनी दावा मिळकत म्हणून नमुद केलेली वाद मिळकत ही मौजे आंबर्डे गावच्या गावठाण मिळकतीच्या हद्दीमध्ये आहे असे कथन केले आहे. याउलट प्रतिवादी तर्फे दाखल केलेल्या कैफियतीमध्ये प्रतिवादी यांनी दाव्यातील वादीची कथने व सदरची बाब नाकारत सदर वाद मिळकत मौजे आंबर्डे, ता. पन्हाळा, या गावची असले शासकिय गायरान गट नं. ४७/१ मध्ये अतिक्रमित बांधकाम केलेली मिळकत आहे ही सत्य वस्तुस्थिती आहे तसे नमुद केले आहे.

**०३.** प्रतिवादी संस्था व शासनाच्या मालकी कब्जेवहिवाटीचे असले गायरान जमिन गट नं. ४७/१ याच्या भूमि अभिलेख पन्हाळा यांचेमार्फत मोजणी प्रमाणे सदर गट नं. ४७/१ याच्या हद्दी निश्चित/ कायम करणेत आल्या आहेत. परंतु सदरची बाब वादी नाकारत आहेत. वरील प्रमाणे सत्य परिस्थिती असून वादी यांनी नमुद केलेप्रमाणे सदर वाद मिळकत मौजे आंबर्डे गावचे गावठाण हद्दीमध्ये येते किंवा कसे याउलट प्रतिवादीने कैफियतीमध्ये कथन केले प्रमाणे प्रस्तुत: वाद मिळकत ही मौजे आंबर्डे, ता. पन्हाळा, यांचे शासकीय गायरान गट क्रं. ४७/१ यामध्ये येते किंवा कसे ही बाब प्रस्तुत दावा गुणदोषावर निर्गत करणेकरीता आवश्यक असलेने प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०४.** प्रतिवादी ही शासकिय संस्था असून सदर अर्जाद्वारे प्रतिवादी संस्था व शासनाच्या मालकी कब्जेवहिवाटीची असले शासकिय गायरान गट नं. ४७/१ या संपुर्ण गायरान मिळकतीत व सदर गायरान मिळकतीमधील बाबीची वस्तुस्थितीनिहाय कोर्ट कमिशनर म्हणून भूमि अभिलेख, पन्हाळा यांचे मार्फत मोजणी करुन त्याप्रमाणे नकाशा व अहवाल सदर कामी दाखल होणे आवश्यक आहे. सदर मोजणी झालेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसुन सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्यास मदत होणार आहे.

**०५.** प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.३५ वर सादर करुन वादीची कथने नाकारली आहेत. प्रस्तुत कामातील नि.क्रं.५ वरील तुर्तातुर्त मनाई अर्ज मे. न्यायालयाने गुणदोषावर निर्णयित करते समयी दावा मिळकत ही वादींचे प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची असलेचे अनुमान काढून केवळ दावा मिळकत मालकीचे नसलेचे कारणावरुन वादींचा तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर केलेला होता. त्यामुळे वादी सदर आदेशा विरुध्द मे. जिल्हा न्यायालय कोल्हापूर येथे अपील क्रं. १३८/२०२३ दाखल केले होते. सदरचे अपील मंजूर झाले असून वादीचा मनाई अर्ज मंजूर करुन प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश पारित केला आहे.

**०६.** प्रस्तुत कामी प्रतिवादींचेच कथनानुसार दावा मिळकतीची शासकीय कार्यालयामार्फत यापूर्वी मोजणी झाली असल्यास पुन्हा मोजणी करणेचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच दावा मिळकत ही ग्रामपंचायत आंबार्डे यांचेकडील असेसमेंट दप्तरी नोंद असणारी मुळ गावठाण हद्दीतील खालची गल्ली येथील मिळकत क्रं. १४१ अशी असून प्रतिवादींनी नि.क्रं.३१ चे अर्जाचे कामी आंबार्डे येथील भू.गट क्रं. ४७/१ या मिळकतीची मोजणी करणेची मागणी केली असून ती मागणी चूकीची व बेकादेशीर अशी आहे. तसेच दावा मिळकती शिवाय अन्य त्रयस्थ मिळकतीची मोजणी करुन मागणेचा अधिकार प्रतिवादीस येत नाही अगर मे. न्यायालयाला देखील कायदयातील तरतुदींचे विरुध्द जाऊन अशा स्वरुपाची दाद

मान्य करता येणार नाही. सध्या दावा पुराव्यासाठी प्रलंबित असून प्रतिवादी यांना पुराव्याची संधी मिळणार आहे. प्रतिवादी हे या अर्जाद्वारे मे न्यायालयामार्फत पुरावा गोळा करण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला आहे. तो नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०७.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीनी सदरचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी हे एकमेकांच्या लगतचे धारक असल्याने त्यांचेकडून एकमेकांच्या मिळकतींमध्ये अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रतिवादीने दाव्यामध्ये वादी हे दावा मिळकत गायरान जमिन गट नं. ४७/1 मध्ये अतिक्रमण केले आहे किंवा कसे याबाबत तक्रार केली आहे. सबब, त्यांचेमध्ये मिळकतींच्या हद्दीवरुन वाद असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत दावा मिळकतीची सद्य व सत्य परिस्थिती पटलावर येणे अंत्यत आवश्यक आहे. अशा परिस्थितीत दोन्ही पक्षकारांमधील वाद संपुष्टात येण्याकरीता तसेच न्यायालयास योग्य त्या निष्कर्षापर्यंत पोहचण्याकरीता दावा मिळकतीची मोजणी होणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश.

## <u>आदेश.</u>

०१. सदरचा अर्ज मंजूर करणेत आला आहे.

०२ सदर कामी कोर्ट कमिशनर म्हणून उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, पन्हाळा यांची नेमणूक करणेत आली आहे.

०३. कोर्ट कमिशनर यांनी मौजे आंबर्डे, ता. पन्हाळा येथील शासकिय गायरान गट क्रं.४७/1 या मिळकतीची मोजणी करुन हद्दी निश्चित कराव्यात, त्याचे मोजमाप, अतिक्रमण इत्यादी नकाशामध्ये दर्शवून,पंचनामा करुन तसा नकाशा व वस्तुस्थितीचा अहवाल या न्यायालयाकडे सादर करावा.

४. वादी यांनी कोर्ट कमिशनर यांचे शुल्क भूमी अभिलेख कार्यालय, पन्हाळा यांचे कार्यालयात तात्काळ भरावे.

VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2025.05.08 17:34:33 +0530

(व्ही.ए.लावंड-कोकाटे)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
कळे-खेरीवडे.

कळे-खेरीवडे.
दि. ०८/०५/२०२५.